गरीब जानके हम

ओ. पी. नय्यरने दिलेल्या असंख्य अविस्मरणीय गाण्यांपैकी रफी आणि गीता दत्तने गायलेले हे द्वंद्वगीत कोणाच्या कानावरून गेले नसेल असा रसिक विरळाच. खरं तर या गीताचा एकूण मूड तसा दर्दभरा असला तरी विनोदी नट जॉनी वॉकरच्या हजेरीमुळे ते गाणे फारसं कोणी गंभीर घेतलं नाही. मात्र त्याची चाल आणि स्वरमेळ प्रत्येकाला खुळावून गेला. आजही विविध भारतीवर कुठल्या ना कुठल्या कार्यक्रमात हमखास ऐकू येणारं हे गाणं 'छू मंतर' चित्रपटातलं आहे हे जरी ठाऊक असलं तरी त्याच चित्रपटातली बाकीची कुठलीच गाणी कधी ऐकण्यात आली नसल्यामुळे या एकाच गाण्याला उदंड लोकप्रियता मिळाली आणि ती आजही टिकून आहे.

खरं तर 'छू मंतर' पाहण्याचा मोह त्या काळात झाला तो ओ. पी.च्या संगीतामुळे आणि जॉनी वॉकरच्या कॉमेडीवर निखळ हसता यावे म्हणून. दस्तुरखुद्द जॉनी वॉकरच इथं नायक असल्यावर चित्रपटाची कथाही तशीच हलकीफुलकी डोक्याला ताप न देणारी असणार ही कल्पना इथं तंतोतंत खरी ठरते. समोर दिसेल त्याचा निर्भेळ आनंद लुटा.

शेतात उभं केलेल्या बुजगावण्यासारखा दिसणारा किरकोळ शरीरयष्टीचा बैजू (जॉनी वॉकर) हा बसंतपूरचा रहिवासी. त्याला गाण्याचं चांगलं अंग. त्यामुळे तो उत्साहाने गायचा. तीही प्रेमाची गाणी. तो गाऊ लागला की सगळे मंत्रमुग्ध होऊन ऐकत. गावातल्या पोरीबाळीही बैजूच्या गाण्यावर फिदा असायच्या. बैजूही मग चेकाळून जायचा आणि त्यांची छेडछाड करायचा. अर्थात त्याचा हा आगाऊपणा बैजूच्याच अंगाशी येऊन त्याला गावकरी यथेच्छ बदडूनही काढायचे. पण सुधारणा होईल तो बैजू कसला ? अखेर कंटाळलेले गावकरी बैजूलाच त्या गावातून हाकलून देतात.

बैजू मग सरळ निघतो ते थेट कुठल्याशा दौलतपुरला पोहोचतो. तिथला राज्यकर्ता (गजानन जागीरदार) आपली लाडकी कन्या रत्ना (अनिता गुहा)सह राहत असतो. बैजूच्या नजरेस आपल्या महालाच्या सज्जात उभी असलेली रत्ना दिसते आणि तो तिच्या प्रेमातच पडतो. लागलीच तिच्यासाठी गाणी गाऊ लागतो. तीही बैजूला नेत्रपल्लवी करून प्रतिसाद देते. हा प्रकार रोजच होऊ लागल्याने रत्नाच्या बापाच्या हे प्रकरण लक्षात येतं आणि रागाच्या भरात तो बैजूची आपल्या माणसांकरवी पोत्यात गठडी वळतो आणि सरळ ते पोते नदीत फेकून देतो.

पण बैजूचं नशीब बलवत्तर. तो दामू (एस. बॅनर्जी) या कोळ्याच्या हाती लागतो. शिवाय त्या कोळ्याची चोरांपासून सुटकाही करतो. दामू खूश होऊन बैजूला आपल्या घरी आश्रय देतो. या दामूला साँवली (श्यामा) नावाची मुलगी असते. इथं मात्र बैजू नसत्या उचापती न करता आपल्या आश्रयदात्याच्या या मुलीला बहिणीसमान मानतो.

या साँवलीचं एका श्रीमंत जमीनदाराच्या मनोहर (करण दिवाण) नावाच्या मुलावर प्रेम असतं. मनोहरसुद्धा साँवलीवर प्रेम करीत असतो. पण त्याच्या बापाला आपल्याच तोलामोलाची श्रीमंत मुलगी सून म्हणून हवी असते आणि बापाला विरोध करण्याची क्षमता मनोहरमध्ये नसते.

बैजूला या सगळ्या गोष्टीची माहिती मिळताच तो त्या दोघांच्या लग्नासाठी प्रयत्न करायचं ठरवतो. त्याच वेळी बैजूला आणखी एक गोष्ट समजते. मनोहरचा बाप त्याच्या मुलाचं लग्न दौलतपूरच्या राजाची मुलगी रत्ना हिच्याबरोबर करण्याचं

ठरवतो आहे. य
जडलेला असत
केलेलं असतं.
साँवलीला मदत
त्याचाही स्वार्थ
दौलतपूर गाठत
लग्नाचा प्रस्ताव


जॉनी वॉकर


श्यामा

चित्रपट : 'छू मंतर'
बॅनर : सादिक प्रॉडक्शन्स
निर्माता : पी. बी. बिलिमोरिया
दिग्द. : एम. सादिक
गीतकार : जाँ निसार अख्तर
प्रदर्शन : शुक्र. १८ मे १९५६
संगीत : ओ. पी. नय्यर
कलाकार : श्यामा, जॉनी वॉकर, अनिता गुहा, गजानन जागिरदार, एस. बॅनर्जी, राज मेहरा, शीला कश्मिरी, करण दीवान.
गाणी : १) आँख में सूरत तेरी, लब पर तेरा फसाना है... रफी
२) आजा रे आजा ना सता रे पिया, ना जला रे जिया... आशा/ कोरस
३) गरीब जान के, हमको न तुम मिटा देना... रफी (भाग १)
४) हमने जब दिल था दिया, कोई वादा था किया हुजूर आपने... रफी/ शमशाद बेगम
५) गोरी गोरी रात है, तारों की बारात है, आजा ओ आजा... गीता दत्त
६) गम नही कर मुस्कुरा, जीने का लेले मजा... रफी/ गीता दत्त
७) जब बादल लहराया, जिया झूम झूम के गाया... गीता दत्त
८) मैं तो बाँके नैनोवाली, मेरी बाते निराली... रफी/ आशा भोसले
९) रात नशीली, रंग रंगीली मस्त हवा, जा मेरे चंदा... गीता दत्त
१०) गरीब जान के हमको न तुम मिटा देना... रफी/ गीता दत्त (भाग २)

...के हमको न तुम मिटा देना...

तो
तो.
च्या

ठरवतो आहे. या रत्नावर तर बैजूचा जीव जडलेला असतो आणि तिनेही बैजूला पसंत केलेलं असतं. मग वेळ न दवडता बैजू साँवलीला मदत करायची ठरवतो. कारण त्यात त्याचाही स्वार्थ असतोच. तो साँवलीला घेऊन दौलतपूर गाठतो. रत्नाच्या बापापुढे स्वत:च्या लग्नाचा प्रस्ताव मांडतो. रत्नाचा बाप बैजूचा प्रस्ताव स्वीकारतो खरा, पण एका अटीवर. बैजूने त्याला तीन महिन्यांच्या मुदतीत पंधरा लाख रुपयांचा हुंडा द्यायला हवा. बैजू ते आव्हान स्वीकारतो.



झटपट पैसे मिळविण्यासाठी मुंबईला जाऊन गाण्याचे कार्यक्रम करायचे असं ठरवून तो साँवलीला घेऊन मुंबईला येतो. एका नाटक कंपनीत दाखलही होतो. पण दुर्दैवाने त्यांची गाठ गुन्हेगारांच्या टोळीशी पडते. टोळीतील गुंड साँवलीचं अपहरण करतात. मग बैजू नाना खटपटी करून तिची त्यांच्या तावडीतून सुटका तर करतोच, शिवाय चलाखीने त्यांच्या बनावट नोटा पळवतो आणि तेच पैसे रत्नाच्या बापाला हुंडा म्हणून देऊन रत्नाला स्वत:च्या पदरात पाडून घेतो. मग साँवलीचेही मनोहरशी लग्न होतं.

'रतन'सारखा रेकॉर्डब्रेकर चित्रपट दिग्दर्शित करणाऱ्या एम. सादिकचीच 'छू मंतर' ही निर्मिती. एम. सादिक म्हणजेच महंमद सादिक. हा कारदार प्रॉडक्शनमधला अब्दुल रशीद कारदारचा एकेकाळचा सहकारी. तिथं तो एस. यू. सनीच्या जोडीने सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करी. कारदारचे कितीतरी चित्रपट त्याने यशस्वीरीत्या हाताळले. पुढे त्यांच्यात मतभेद होऊन एम. सादिकने कारदारपासून फारकत घेतली. बाहेरचे काही चित्रपट दिग्दर्शित करून बऱ्यापैकी पैसा जमताच त्याने स्वत:ची सादिक प्रॉडक्शन सुरू करून 'सबक'ची निर्मिती केली. त्याने चांगला धंदा करताच 'ड्युअन इन दि सन'वरून 'सैयां' काढला. पण या इंग्रजीपटाची ती भ्रष्ट नक्कल अपयशी ठरली. सादिक अडचणीत आला आणि मदतीसाठी नौशाद मियाँकडे धावला. नौशादने स्वत:च्याच कथेवर चित्रपट काढण्याची आणि स्वत:च संगीत देण्याचे कबूल केल्यावर सादिकने नूतन-भारतभूषणचा 'शबाब' पडद्यावर आणला. तो चांगलाच गाजला. सादिकचे कर्ज फिटले. पण त्याने कथेचे आणि संगीताचे पैसे नौशादला दिलेच नाहीत.

आता सादिकने बिग बजेट निर्मिती बंद करून हलकेफुलके चित्रपट काढायचे ठरवले. मग त्याने जॉनी वॉकरला नायक बनवून छू मंतर, मुसाफिरखाना, दुनिया रंग रंगीली, माईबाप, खोटा पैसा वगैरे चित्रपट निर्माण केले. या सगळ्या चित्रपटात त्याने श्यामालाच नायिका म्हणून चमकवलं होतं.

अर्थात या चित्रपटांबरोबरच एम. सादिक दिग्दर्शक म्हणून लक्षात राहिला तो चौदहवी का चाँद, ताजमहल, बहुबेगम आणि मीनाकुमारीच्या 'नूरजहाँ'मुळे. सादिकच्या मुलाचं पाकिस्तानातील लाहोर इथं लग्न निघालं तेव्हा तिकडे जाण्यापूर्वी सादिक नौशादला भेटून 'तुमचं देणं माझ्यावर आहे. लग्नानंतर परत येऊन अवश्य फेडीन' असं म्हणाला. पाकिस्तानात जाण्यापूर्वी सादिकने आपलं घर, गाडी, चित्रपटांच्या निगेटिव्ह आपल्या सेक्रेटरीच्या हवाली केल्या होत्या. पण मुलाच्या लग्नानंतर सादिक मुंबईला परतलाच नाही. तिकडेच त्याचं आकस्मिक निधन झालं म्हणे!

■ विजय शिंगोर्णीकर